B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 304 (CCCIV) | July, 2021

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refreed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## July -2021

ISSUE No- 304 (CCCIV)

## Impact of Race, Caste, Class and Religion on Indian and International Society

**Prof. Virag.S.Gawande**
**Chief Editor :**
**Director**
**Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.**

**Dr Nitin A. Mathankar**
**Executive-Editor**
**Principal,**
**Late Vasantrao Kolhatkar Arts College, Rohana**

**Dr. Deoman S. Umbarkar**
**Editor**
**Organizing Secretary ,Department of Sociology**
**Late Vasantrao Kolhatkar Arts College, Rohana**

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 304 (CCCIV) | July, 2021

## INDEX



| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | गांधीवाद आणि गांधी विचारांची प्रासंगिकता — प्रा. डॉ. विशाल प्रकाश लिंगायत | 1 |
| 2 | केंद्रिय और मिशनरी विद्यालय में खेल की सुविधाओं का एक तुलनात्मक अभ्यास — प्राचार्य. डॉ. सुनिता एस. सोनारे | 5 |
| 3 | सदानंद देशमुख यांच्या साहित्यातील समाजजीवन — प्रा. स्मिता गो. शहाणे | 8 |
| 4 | भ्रमणध्वणी तंत्रज्ञानाचा वाढता उपयोग व त्याचा समाजव्यवस्थेवर होणारा परिणाम' — Dr. Savita B. Chiwande | 15 |
| 5 | भारतीय राजकारणावर जाती व धर्मांचा प्रभाव — डॉ. संजय अवधुत | 22 |
| 6 | जनजातीय सामाजिक संरचना— एक दृष्टिकोण — डॉ एस आर पाटील | 26 |
| 7 | भारतीय जातीव्यवस्था ही परिवर्तनाच्या सिमारेषेवर आहे. — डॉ.राजकुमार भगत | 30 |
| 8 | भारतीय लोकशाही समोरील आव्हानांचे बदलते स्वरूप — प्रा.डॉ.नितेश आर. रामटेके | 35 |
| 9 | आधुनिक मराठी कवितेतील निसर्ग दृष्टिकोन — प्रा. ममता राऊत | 39 |
| 10 | जातीवाद आणि मुस्लिम मराठी कविता — डॉ. कविता मुरारीलाल राजाभोज | 45 |
| 11 | कोरोना महामारी के परिप्रेक्ष्य में जैन—धर्म की उपादेयता — कमलेश कुमार जोशी | 52 |
| 12 | भारतीय सामाजिक व्यवस्था पर जाति और धर्म का प्रभाव — देवीलाल रोझ | 56 |
| 13 | मानवतावादाचे पुरस्कर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर — प्रा.डॉ. अरविंद म. पुनवटकर | 61 |
| 14 | जात व वर्ग :सामाजिकस्तरिकरण — प्रा. अमिता महातळे (विरूटकर) | 65 |
| 15 | भारतीय समाजातील जातीसंस्थेचे वर्तमान स्वरूप — प्रा. विठ्ठल सदाशिव चौधरी | 69 |
| 16 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जातीनिर्मुलन विषयक विचार — डॉ.विलास चव्हाण | 73 |
| 17 | हिंदूधर्मातील ऐहिक आणि पारमार्थिक जीवन संदर्भातील समन्वयात्मक दृष्टिकोण — प्रा.डॉ. सीमा देशपांडे | 76 |
| 18 | महाविद्यालयीन ग्रंथालय व्यवस्थापनात SWOT चीआवश्यकता — प्रा. रोहिदास सदाशिव लोहकरे | 81 |
| 19 | शिक्षण,जात—वर्गीय वास्तव आणि सद्य:स्थिती — रेणुकादास उबाळे | 86 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 304 (CCCIV)
ISSN : 2278-9308
July 2021

# गांधीवाद आणि गांधी विचारांची प्रासंगिकता

प्रा. डॉ. विशाल प्रकाश लिंगायत
सहायक प्राध्यापक, (मराठी विभाग) श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय,
बार्शी, ता. बाशी, जि. सोलापूर ४१३४०१
भ्रमणध्वनी ७५८८०२०२९०, मेल–vishallingayat28@gmail.com

महात्मा गांधीचे संपूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी. त्यांचा जन्म २ऑक्टों १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर या गावी झाला. त्यांचे वडील पोरबंदर व राजकोट संस्थानात दिवाण म्हणून कार्यरत होते. म.गांधीजींच्या आई पुतळाबाई या खुप धार्मिक होत्या. गांधीजींवर श्रावणबाळ, राजा हरिश्चंद्र यांच्या कथांचा खूप प्रभाव होता. गांधीजी शालेय जीवनात अतिशय सामान्य विद्यार्थी होते. मे १८८३ मध्ये गांधीजींचा कस्तुरबाबाई यांच्याशी विवाह झाला.त्यावेळी गांधीजींचे वय १३ वर्ष होते, तर कस्तुरबाबाईचे वय १४ वर्ष होते. इ.स. १८८७ साली गांधीजी मुंबई विद्यापीठात मॅट्रिक परीक्षा पास झाले. त्यानंतर इ.स. १८८८ मध्ये लंडन येथे वकिलीचा अभ्यास करण्यासाठी ते गेले. इ.स. १८९१मध्ये वकिलीचा अभ्यास पूर्ण करून ते भारतात परत आले. वकिल झाल्यानंतर मुंबईत त्यांचा वकिलीचा व्यवसाय सफल झाला नाही, कारण ते खूप लाजाळू होते.इ. स. १८९३ मध्ये त्यांनी दक्षिण अफ्रिकेतील दादा अब्दूला आणि कंपनीच्या भारतीय कंपनीसोबत एक वर्षाचा करार केला व ते त्या कंपनीचे वकील म्हणून दक्षिण अफ्रिकेत गेले. त्यांचा करार एकच वर्षाचा असूनही ते तेथे २२ वर्ष राहिले. कारण द.अफ्रिकेत त्यांना काळ्या लोकांसोबत केल्या जाणाऱ्या भेदभावाला सामोरे जावे लागले. भारतीयांना दिली जाणारी असमान वागणूक त्यांनी तेथे अनुभवली.प्रथम वर्गाचे (I[st] class) तिकिट असूनही त्यांना पिटरमारित्झबर्गमध्ये तिसऱ्या वर्गाच्या डब्यात बसायला लावले का.? तर ते फक्त भारतीय होते म्हणून. "वैदिक धर्म आणि जैन यांच्यात पुष्कळ भेद आहेत, तरी त्यामुळे ते एक राष्ट्र नाहीत असे नाही. आपण गुलाम बनलो आहोत म्हणूनच आपले तंटे आपण तिसऱ्याकडे घेऊन जातो."[१]

भारतीयांबद्दलची वंशभेद आणि असमानतेची वागणूक अनुभवल्यावर त्यांनी त्याविरोधात लढा देण्याचे ठरवले. तिथे त्यांनी वेगवेगळे लढे उभे केले. त्या लढयांचा तपशील असा—

१.भारतीयांचा मतदानाचा हक्क काढून घेण्यात आला होता. त्याविरूध्द गांधीजींनी आवाज उठवला.

२.इ.स. १८९४ मध्ये त्यांनी अफ्रिकेत नाताळ भारतीय कॉंग्रेसची स्थापना केली. या कायदयाने तेथील प्रत्येक भारतीयाला एका पक्षाखाली आणले.

३.इ. स. १९०६साली ट्रान्सवाल सरकारने एका नवीन कायदयाची घोषणा केली. या कायदयाला विरोध करण्यासाठी म. गांधींनी अफ्रिकेत ११ सप्टेंबर १९०६ ला अहिंसात्मक सत्याग्रहाचा मार्ग अवलंबला.

द.अफ्रिकेतील आपले कार्य आटोपून म.गांधी ९ जाने.१९१५ रोजी परत भारतात आले. भारतात आल्यानंतर ५ वर्ष त्यांनी भारतातील परिस्थिती अनुभवली. भारतातील प्रत्येक खेडयात,गावागावात ते फिरले. भारतातील सर्व परिस्थितीचा त्यांनी यादरम्यान आढावा घेतला. याचसुमारास त्यांचा संबंध गोपाल कृष्ण गोखले यांच्याशी आला. गो.कृ.गोखले हे त्यावेळी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे प्रमुख नेते होते. अत्यंत शांत, संयमी स्वभावाच्या गोखल्यांचा गांधीजींवर प्रभाव पडला नसता तर नवलच होते. त्यामुळेच गोखले गांधीजींचे राजकीय गुरू म्हणून ओळखले जातात.गांधीजींनी

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 304 (CCCIV)
ISSN : 2278-9308
July 2021

जगात कोणताही देश असा नाही, जो फक्त दोन शब्दांनी स्वतंत्र झाला आहे...ते दोन शब्द आहेत. 'करेंगे या मरेंगे', 'चले जाव', 'छोडो भारत', 'जय हिंद', 'चलो दिल्ली'अशा या दोन शब्दांतून संपूर्ण देशाला साधने नसतांना जागे करण्याची, गदागदा हालवण्याची ताकद गांधींच्या नेतृत्वात होती. हा 'गांधीवाद' स्वातंत्र्य मिळविण्यापूरता नव्हता. तो जीवन–मरणाची एक शैली आहे, श्रमाशिवाय मिळविलेला पैसा खोटा आहे हे सांगण्याचे धाडस गांधीवादात आहे, श्रमाची पूजा केली पाहिजे हे सांगण्याचे धाडस गांधीवादात आहे, कोणतेही काम करायला लाज वाटता कामा नये हे ही गांधीवाद सांगतो. परंतु या देशातला गांधीवाद गेल्या काही काळात पराभूत होतांना दिसतो आहे. गांधी जीवनाचे एक तत्वज्ञान आहे. परदेशातील अनेक देशांनी या गांधीवादाच्या तत्वज्ञानाने त्यांना विश्वपुरूष मानले,राष्ट्रपिता मानले.अशा या युगपुरूषाला आपल्या देशातील जनता मात्र विसरायला लागली आहे. गांधीजींना ज्या प्रवृत्तीने मारले त्या प्रवृत्तीचा, त्या मानसिकतेचा उदोउदो होतो आहे, त्याचा गौरव होतांना दिसत आहे, त्या मारेकऱ्याची स्मारके उभी करण्याची भाषा बोलली जात आहे. त्यावर नाटके येतात, ('मी नथुराम गोडसे बोलतोय') दुर्दैवाने आजचे शासन, सरकारही गांधीवादी विचारांना संपवण्याच्या मागे लागले आहे. या सरकारला आणि या प्रवृत्तीला हे स्पष्टपणे सांगायची गरज आहे की, असा प्रयत्न करणारे संपतील, मरतील, परंतु गांधीवाद नावाचा विचार कधीही संपू शकणार नाही. ''महात्मा पदवीपेक्षा सत्य मला अनंतपटीने प्रिय आहे. मला माहित आहे की मी महात्मा नाही, अल्पात्मा आहे. या गोष्टीची मला सदैव जाणीव आहे.''"गांधींना मारणारे मेले, परंतु गांधी विचारांच्या रूपाने आजही जीवंत आहेत, 'तुमच्या आमच्या सर्वांच्या मनात'. गांधीवाद हा विचार आहे, या विचाराचे सामर्थ्य ज्यांच्याजवळ आहे, त्या विनोबा भावेंच्या गांधीवादाचे सामर्थ्य बंदूकीच्या गोळीपेक्षा अधिक प्रभावी आहे. त्यामुळे 'गांधीवाद' आणि गांधीविचार हा कधीही हतबल होणार नाही आणि कधीही पराभूत होऊ शकणार नाही. विकृत प्रवृत्तीचे लोक भलेही गोडसेला नायक करायच्या मागे असतील, परंतु 'नालायक' कधी 'नायक' होऊ शकत नाही आणि म्हणून गांधींना मारणारे मेले आहेत, मात्र गांधीवाद कायमच जीवंत राहणार आहे असे मलावाटते.

**संदर्भटीपा :–**

१ गांधी मो.क., 'हिंद स्वराज', प्रकरण १० वे– 'हिंदूस्थानची दशा–हिंदु–मुसलमान', पृ. ३२/३३
२ गांधी मो.क., अनुवादक–पटवर्धन सी.पु., 'सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा', नवजीवन प्रकाशन मंदिर–अहमदाबाद–१४, २८वे पुनर्मुद्रण, एप्रिल–२०११,पृ. १७४
३ कीर धनंजय, 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर',पृ.२३९
४ कसबे रावसाहेब, 'गांधी पराभूत राजकारणी आणि विजयी महात्मा',लोकवाङ्मयगृह मुंबई, प्र. आ.ऑक्टों.२०२०,पृ.२८७
५ गांधी मो.क., गांधी रिसर्च फाउण्डेशन, 'हिंद स्वराज्य' नवजीवन प्रकाशन मंदिर–अहमदाबाद–१४,
दुसरे पुनर्मुद्रण, जून–२०१९,पृ. ९५
६देसाई वालजी गोविंदजी(संपादक), 'चारित्र्य आणि राष्ट्र निर्माण–गांधी मो.क.,' नवजीवन प्रकाशन मंदिर–अहमदाबाद–१४, ४थे पुनर्मुद्रण, मे–२०१३,पृ. १३
७ कसबे रावसाहेब, उ.नि. ४, पृ.२८७
८ कृपालानी कृष्ण (संपादक) अनु.–हेडा ब्रिजमोहन, 'गांधीजींचे जीवन त्यांच्याच शब्दात', नवजीवन प्रकाशन मंदिर–अहमदाबाद–१४, ११वे पुनर्मुद्रण, जुन–२०१३,पृ. ७२



...ed

186

SJIF Impact Factor - 5.54

E- ISSN 2582-5429

# AKSHARA

## Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

November 2021, Special Issue 03, Vol. IV

Chief Editor : Dr. Girish S. Koli, AMRJ

For Details Visit To - www.aimrj.com

Akshara Publication

E- ISSN 2582-5429
AMRJ Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal SJIF Impact- 5.54
November 2021 Special Issue 03 Vol. IV

# Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

Special Issue 3 Volume IV

November 2021

Akshara Publication
Plot No 143 Professors colony,
Near Biyani School, Jamner Road, Bhusawal Dist Jalgaon (Maharashtra) 425201
Website:www.aimrj.com Email:aimrj18@gmail.com

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal SJIF Impact- 5.54
November 2021 Special Issue 03 Vol. IV

# Index


| Sr.No | Title of the Paper & Author's Name | Pg.No |
|---|---|---|
| 1 | भटक्या विमुक्तांच्या साहित्याचे स्वरूप - प्रा. डॉ. दत्तात्रय महादेव डांगे | 05 |
| 2 | साठोत्तरी साहित्य प्रवाहांची सामाजिकता - डॉ.रमेश अर्जुन शिंदे | 10 |
| 3 | साहित्यातील भटक्या व विमुक्त जाती जमातींचे चित्रण एक अभ्यास - प्रा. दिलीप महादू कोने | 13 |
| 4 | भटक्या श्रमिक धनगर स्त्रियांचे साहित्य जात्यावरील ओवी - प्रा.डॉ. तानाजी ज्ञानदेव पाटील | 16 |
| 5 | भटक्या विमुक्तांची आत्मकथने सामाजिक वास्तवाचे प्रभावी स्वकथन - डॉ. विद्या विजय नावडकर | 20 |
| 6 | स्त्रीवादी साहित्यातील शोषित वंचित स्त्रियांचे चित्रण - प्रा. डॉ. ज्योती सुबराव माने | 25 |
| 7 | शोषित आणि वंचितांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दलित कथावाङ्मयासमोरील आव्हाने - प्रा. मोहन चव्हाण | 29 |
| 8 | स्त्री जन्मा तुझी हीच कहाणी एक सामाजिक चिंतन - प्रा. स्वाती मगदूम | 32 |
| 9 | नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरी - प्रा. डॉ. सोनू लांडे | 35 |
| 10 | दलित साहित्य : काही विशेष - डॉ. सर्जेराव पद्माकर | 40 |
| 11 | स्त्रियांचे नियतकालिकांतील वैचारिक लेखन - डॉ. तेजस तानाजी चव्हाण | 43 |
| 12 | स्वातंत्र्योत्तर कालखंडातील दलित आत्मकथनाची वैशिष्ट्ये - डॉ. विजय रेवजे | 47 |
| 13 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सक्षमीकरणासंबधीचे विचार - श्री. सुहास बापू मोरे | 50 |
| 14 | अण्णाभाऊ साठे यांच्या फकिरा कादंबरीतील आशयविश्व व समाजदर्शन - प्रा.डॉ.सुभाष दिनकर आहेर | 52 |
| 15 | श्रमिक साहित्याची धगधग : नारायण सुर्वे यांच्या कविता - श्री. गौरीशंकर दत्तात्रय खोबरे | 56 |
| 16 | दलित आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार डॉ. गंगाधर पानतावणे - प्रा. डॉ. मधुकर गणेश मोकाशी | 60 |
| 17 | सुनील अवचार यांच्या कवितेतील वंचित शोषितांचे चित्रण - डॉ. मगदूम बळवंत | 63 |
| 18 | दिनकर गायकवाड यांच्या साहित्यातील शोषित आणि वंचितांचे चित्रण - प्रा. डॉ. सुनील जगन्नाथराव निगडे | 66 |
| 19 | कृष्णराव भालेकर यांच्या कवितेमधील श्रमिकांचे चित्रण - प्रा. डॉ. तानाजी अंबादास देशमुख | 69 |
| 20 | नामयाची जनी जगण्याचा आधार : अनुभव नव्हे प्रासंगिकता - प्रा. डॉ. विशाल प्रकाश लिंगायत | 73 |
| 21 | 'आंदकोळ' आत्मकथेमधील वास्तवदर्शन- प्रा. डॉ. संगीता पैकेकरी | 76 |
| 22 | 'निशाणी डावा अंगठा' कादंबरीतील समस्या - प्रा. डॉ.बाबासाहेब पिरगोंडा नाईक | 80 |
| 23 | 'सल ' दलित काव्यसंग्रहातील समाज चित्रण - प्रा. सुहास मुरलीधर उपडे | 82 |
| 24 | 'मरणकळा' आत्मकथनातील सामाजिक विषमतेचे चित्रण - प्रा.डॉ.कांचन विजय नलवडे | 85 |
| 25 | हिंदी उपन्यास साहित्य में किसानों का चित्रण- प्रा. विश्वनाथ चंद्रकांत पटेकर | 88 |
| 26 | भगवानदास मोरवाल का साहित्य : शोषित कृषक की दास्तां- डॉ. गणेश शेकोकर | 91 |
| 27 | हिन्दी दलित कहानियों में दलित परिवेश का चित्रण- विप्रा जनार्दन राऊल | 95 |
| 28 | जयप्रकाश कर्दम के उपन्यासों में दलित चित्रण ('छप्पर' उपन्यास के विशेष संदर्भ में) - डॉ. भारत श्रीमंत खिलारे | 98 |

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal SJIF Impact- 5.54
November 2021 Special Issue 03 Vol. IV

20

# नामयाची जनी जगण्याचा आधार : अनुभव नव्हे, प्रासंगिकता

प्रा. डॉ. विशाल प्रकाश लिंगायत
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग
श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविदयालय, बार्शी, ता.- बार्शी, जि. सोलापूर
मोबा. नं 7588020290 email. -vishallingayat28@gmail.com

प्रस्तावना :- 'स्त्रीवाद' हा असा विचारप्रवाह आहे की जो स्त्रियांच्या दुय्यम स्थानाचे, तिच्यावर होणाऱ्या अन्यायाचे, शोषणाचे, लाभलेल्या बंधनांचे, गुलामगिरीचे व दुय्यमत्त्वाचे स्थान या संबंधीचे नवे आकलन करून देणारा विचारप्रवाह आहे. 'स्त्रीवाद' हा इ. स. १९६० नंतरच्या दशकात वेगाने पुढे येणारा साहित्य प्रवाह आहे. पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रीला कधी देवता बनवून तिचे मनुष्यत्व नाकारले, तर कधी तिला शोभेची बाहुली बनवून तर कधी एक भोगवस्तू म्हणून पाहिले. कधी तिला मदनाची पुतळी म्हणून, कधी तिला दासी, कुलटा, व्यभिचारिणी म्हणून हीन लेखले. स्त्रीवाद समजून घेण्यासाठी स्त्रियांना समाजामध्ये मिळणाऱ्या दुय्यम स्थानाविषयीचे विचार समजून घेणे क्रमप्राप्त ठरते. 'स्त्रीवाद' म्हणजे स्त्रीला आपल्या स्वत्वाची जाणीव होणे, तिला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा अर्थ कळणे होय. आपण एक माणूस आहोत याची जाणीव होणे, आपले शोषण होते आहे याची तिला जाणीव होणे, तिने आपल्या दडपल्या जाणाऱ्या स्वत्वासाठी संघर्षप्रवण होणे म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीवाद म्हणजे काय.? "भांडवलशाहीतून परिणत झालेला वर्गलढा आणि लैंगीक श्रम विभागणीतून झालेली स्त्री-पुरुष विषमतेची परिणती यांची सांगड मार्क्सवादी स्त्रीवादाची मांडणी केली जाते." [१] स्त्रीवाद म्हणजे स्त्रीला आपल्या स्वत्वाची जाणीव होणे, तिला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा अर्थ कळणे होय. स्वतःचे हक्क कळणे होय. आपण एक माणूस आहोत याची जाणीव होणे म्हणजे स्त्रीवाद होय. "स्त्रियांच्या म्हणून पुरुषांपासून वेगळ्या असलेल्या जाणीवा व्यक्त होण्यासाठी नवीन भाषा व नवीन वाङमयीन बंधाची स्त्रीवादी साहित्याला गरज वाटते." [२]

महाराष्ट्रातील महदंबा, मुक्ताबाई, बहिणाबाई, सोयराबाई, निर्मळा आणि जनाबाई इत्यादी संत कवयित्रींनी तेराव्या शतकापासून ते अठराव्या शतकापर्यंत तसेच एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, लक्ष्मीबाई टिळक इत्यादी लेखिकांनी ललित व वैचारिक पातळीवर स्त्री-पुरुष विषमतेचे पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेचे तसेच स्त्रियांवरील अन्यायाचे जुलुम-शोषण व त्यातून स्त्रियांना भोगावी लागणारी दुःखे, वेदना यांचे प्रभावी चित्रण केले आहे. "मल्लिका अमरशेख यांच्या काव्यातील प्रतिमासृष्टी तर स्त्रियांच्या कवितेला वेगळ्या वळणावर घेऊन आली आहे. त्यांनी मराठी कवयित्रींच्या कवितेतील भाषा नुसती बदलली नाही, तर त्यात प्रचंड उलथापालथ घडवून आणली आहे." [३] विसाव्या शतकातील आधुनिक स्त्रीवादी साहित्यात कमल देसाई, कविता महाजन, मेघना पेठे, प्रिया तेंडुलकर, सानिया, नीरजा यांच्या कथा-कादंबरी व ललित लेखनाने मोलाची भर घातली आहे. कमल देसाईंच्या 'काळासूर्य' आणि 'हॅट घालणारी बाई' (१९७५) या कादंबरीत प्राचीन मिथक कथांना नवे स्त्रीवादी आयाम दिले आहेत. तर "कवयित्री नीरजा हिने द्रौपदी पांचालीच्या दुःखातून स्वतःच्या शरीरालाच प्रश्नांकित करणारी भाषा वापरली आहे." [४]

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक भावविश्वात संत जनाबाईंना महत्त्वाचे स्थान लाभले आहे. संत जनाबाई हे नाव उच्चारले की आपल्या सरावलेल्या कानांना, डोळ्यांना आणि मनालाही 'नामयाची जनी' हेच संबोधन लक्षात येते. जनाबाईंच्या अभंगात त्यांनी केलेल्या काबाडकष्टाची, दगदगीची, श्रमाची वर्णने येतात. जाते धरणे, कांडणे, सारवणे, धुणी-भांडी करणे अशी सगळी कामे जनाबाईसाठी स्वतः पांडुरंग करतो, अशी एक धारणा आपल्याकडे पिढ्यानपिढ्या चालत आली आहे ती स्वाभाविक आहे. कारण संत जनाबाईंच्या अनेक अभंगातून त्याचे परिमाण पहावयास मिळते. जसे की, "दळीता कांडिता त्या विठ्ठलमय झाल्या स्वतःचं दासीपण, जनीपण विसरून विठ्ठलरूप झाल्या." [५] भागवतधर्म मंदिराच्या पायाभरणीत संत जनाबाईंचा हातभार

E- ISSN 2582-5429
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal SJIF Impact- 5.54
AMRJ
November 2021 Special Issue 03 Vol. IV

महत्त्वाचा आहे. संत नामदेवांबरोबर युगानुयुगे नाते सांगणाऱ्या जनाबाई खऱ्या अर्थाने श्रम देवताच होत्या. ईश्वराची साधना करण्यासाठी, संसार प्रपंचाचा त्याग करून कड्या-कपाऱ्यात वास करण्याऐवजी नित्याची कर्मे करता-करता, हसत-खेळत सहजपणे भक्ती करता येते. असे जीवनाभिमुखतेचे तत्वज्ञान त्या सांगतात. आपल्या एका अभंगात त्या म्हणतात...,

"दळू कांडू खेळू | सर्व पाप ताप जाळू ||
सर्व जीवांमध्ये पाहू | एक आम्ही होऊन राहू ||" [६]

नामदेवांची दासी या भूमिकेशी जनाबाई इतक्या एकरूप झालेल्या होत्या की, हे नाते जन्मोजन्मीचे असल्याचे त्यांना वाटते. जनाबाईंनी सगुण-निर्गुण, द्वैत-अद्वैत, भक्ती-ज्ञान, शैव-वैष्णव, सवर्ण-शूद्र, स्त्री-पुरुष यांची यशस्वी सांगड घातली. हे सगळं करत असतांना मात्र जनाबाई रमल्या त्या खेडोपाड्यातील निरक्षर, कष्टकरी बायाबापड्यांमध्ये. विश्वातील आजपर्यंतच्या सर्व कष्टकरी स्त्रियांच्या त्या प्रथम प्रतिनिधी आहेत. उपेक्षितांचे अंतरंग उलगडून दाखवतांना भक्तीच्या बळावर 'पंधरावी ती दासी जनी' असे स्वतःचे महत्त्वपूर्ण स्थान त्या दाखवतात. संत जनाबाईंच्या ४५० अभंगांमधून नाममहिमा, गुरुमहिमा, संतमहिमा, पंढरीमहात्म्य,बाळक्रीडा, स्वानुभव इत्यादी अनेक विषय आलेले आहेत. देवाशी एकरूप होऊनही माणसांकडून ज्यांच्या वाटेला उपेक्षित जिणं आलं, त्या जनाबाईंचा खडतर प्रवास आजही संपलेला नाही. संत नामदेवांच्या घरी दासी म्हणून त्यांचं उभं आयुष्य संपलं. शेणगोठा, भांडी धुणे, कपडे, दळणकांडण, झाडलोट अशा त्यांनी जन्मभर केलेल्या कामाचा वारसा चालवणाऱ्या महिला आजही आहेत. "आपल्यापैकी अनेकांच्या घरात आहेत, पण फक्त त्यांचं जनाबाईंशी नातं सर्रास सांगण्याची पद्धत आपल्याकडे नाही त्यामुळे ते आपल्याला कळू शकत नाही." [७]

मराठीच्या आदिकाळात ज्या श्रेष्ठ संतस्त्रिया झाल्या त्यात नामदेवांची जनी अर्थात शिष्या जनाबाई यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. जनाबाईंचा जन्ममृत्यू, आई-वडील, मूळगाव, पूर्व जीवन निश्चितपणे सांगता आले नाही, तरी त्या पंढरपुरात संत नामदेवांच्या परिवारात सामावून गेल्या होत्या आणि त्यांनी उत्कट विठ्ठलभक्तीची भावकविता लिहिली हे निर्विवाद आहे. स्त्री जन्म म्हणवूनी न व्हावें उदास | साधुसंत ऐसें केले मजी | अशी जनाबाईंची दृढ श्रद्धा आहे." [८] आई-वडिलांनीच दिलेले पोरकेपण, उपेक्षित जीवन असे एका मोलकरणीचे आयुष्य वाटेला आलेल्या जनाबाईंना किती त्रास सहन करावा लागला. त्यांच्या नशिबात काबाडकष्ट तर होतेच पण त्यासोबत त्यांच्यावर चोरीचा आळ आला जनाबाईंवर घेण्यात आलेला चोरीचा आळ हा त्यांच्या चरित्रातील महत्त्वाचा प्रसंग आहे. चोरीचा आळ घेऊन एकट्या जनाबाईंवर चाळीस ब्राह्मण धावून येतात आणि देवाला त्याचे काही नाही. यावरून 'विठो मेला' असे लिहिणे हे जनाबाई आणि विठोबाचे तादात्म्यच आहे असे नव्हे, तर रूढ कल्पनांना धक्का लावत प्रत्यक्ष देवाचीही गय न करणाऱ्या जनाबाई येथे दिसतात. हजारो वर्षे धर्माने घालून दिलेली मर्यादा, आखून दिलेली लक्ष्मणरेषा उधळून लावण्याचे काम ही दासी जनी करत होती. विद्येचा अधिकार नसतांना शूद्र जनाबाई लिहित होत्या, गात होत्या, आपले विचारधन इतरांना वाटत होत्या. त्यामुळे तत्कालीन ब्राह्मण पंडितांचा रोष, शिव्याशाप त्यांना सहन करावा लागत होता. त्यांच्या या संघर्षात्मक भूमिकेचा सुंदर आविष्कार त्यांच्या 'डोईचा पदर आला खांद्यावरी' या अभंगातून व्यक्त झाला आहे. आपल्या या अभंगात त्या म्हणतात..,

"डोईचा पदर आला खांद्यावरी |
भरल्या बाजारी जाईन मी ||
हाती घेऊन टाळ खांद्यावरी वीणा |
आता मज मना कोण करी ||" [९]

साडेसातशे वर्षापूर्वी या महाराष्ट्रात ज्या संत महात्म्यांनी भक्तीभावाची, ज्ञानाची व प्रबोधनाची जी विलक्षण लोक चळवळ सुरू केली, त्यामध्ये संत जनाबाई, संत मुक्ताबाई, संत सोयराबाई, संत बहिणाबाई, संत निर्मळा या संत कवयित्रींनी निर्भयपणे व अतिशय धाडसाने जे योगदान दिले ते अभूतपूर्व आहे. यामध्ये विशेषतः संत जनाबाईंचे कार्य म्हणजे सावित्रीबाई फुले यांनी भारताच्या स्त्री जीवनात जी अभूतपूर्व क्रांती केली, त्याचे प्रथम रणशिंग होय." [१०]

**संदर्भटीपा :-**

१) जाधव मनोहर, (संपादक) 'समीक्षेतील नव्या संकल्पना', स्वरूप प्रकाशन - औरंगाबाद, २००१,प्र.आ. पृष्ठ - १२९

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal SJIF Impact- 5.54
November 2021 Special Issue 03 Vol. IV

२) लिंबाळे शरणकुमार, 'साठोत्तरी मराठी साहित्यातील प्रवाह', दिलीपराज प्रकाशन- पुणे, २००७, प्र.आ. पृष्ठ -१५२
३) सरकटे सदाशिव, '१९८० नंतरची स्त्रीवादी कविता, चिन्मय प्रकाशन - औरंगाबाद, २०११, प्र.आ. पृष्ठ -१०६
४) लिंबाळे शरणकुमार, उ.नि. २, पृष्ठ - १७०
५) परब सचिन / गायकवाड श्रीरंग, (संपा.) 'जनाई', लेख- भवाळकर तारा, 'एक अनोखा सवती मत्सर', अक्षरमुद्रण व प्रकाशन संस्था- आजरा, एप्रिल २०१६, पृष्ठ- ४०
६) तत्रैव, लेख- मोरे सदानंद, 'जनी म्हणे', पृष्ठ- ३०
७) तत्रैव, लेख- पेठकर रूपाली, 'दळिता कांडिता', पृष्ठ- १२३
८) तत्रैव, लेख- कामत अशोक, 'पंधरावी ती जनी', पृष्ठ- १५९
९) तत्रैव, लेख- मिरजकर श्यामसुंदर, 'मनगटावर तेल घाला', पृष्ठ- ५७
१०) तत्रैव, लेख- सासवडे मंगला, 'विठू माझा लेकुरवाळा', पृष्ठ-६६

■ ■ ■

Peer reviewed Journal Impact Factor:7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

*Multidisciplinary International Level Referred Journal*

December-2021 Volume-12 Issue-26

## *Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

**Chief Editor**
Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

**Editor**
Mr. Shashikant Jadhawar
I/C, Principal,
Chhatrapati Shivaji Mahavidyalaya,
Kalamb, Dist. Osmanabad (MS) India

**Executive Editor**
Dr. Anant Narwade
Dr. Raghunath Ghadge
Mr. Anil Jagtap



**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal
Impact Factor-[illegible] ISSN 2230-9578, December 2021 Volume-12 Issue-26
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

*December-2021 Volume-12 Issue-26*

*On*

## *Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

| **Chief Editor** | **Editor** |
| --- | --- |
| **Dr. R. V. Bhole**<br>'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102 | Mr. Shashikant Jadhawar<br>I/C, Principal,<br>Chhatrapati Shivaji Mahavidyalaya,<br>Kalamb, Dist. Osmanabad (MS) India |

**Executive Editor**
**Dr. Anant Narwade**
**Dr. Raghunath Ghadge**
**Mr. Anil Jagtap**

EDITORIAL BOARD

| | | |
| --- | --- | --- |
| Prof. R. J. Varma ,Bhavnagar [Guj]<br>Dr. D. D. Sharma, Shimla [H.P.]<br>Dr. Abhinandan Nagraj, Benglore[K]<br>Dr. Venu Trivedi ,Indore[M.P.]<br>Dr. Chitra Ramanan Navi ,Mumbai[M.S] | guyen Kim Anh, [Hanoi] Virtnam<br>Prof. Andrew Cherepanow, Detroit, Michigan [USA]<br>Prof. S. N. Bharambe, Jalgaon[M.S]<br>Dr. C. V. Rajeshwari, Pottikona [ AP]<br>Dr. S. T. Bhukan, Khiroda[M.S] | Dr. R. K. Narkhede, Nanded [M.S]<br>Prof. B. P. Mishra, Aizawal [Mizoram]<br>Prin. L. N. Varma ,Raipur [ C. G.]<br>Prin. A. S. Kolhe Bhalod[M.S]<br>Prof.Kaveri Dabholkar Bilaspur [C.G] |

**Published by-** Mr Shashikant Jadhawar, I/C, Principal, Chhatrapati Shivaji Mahavidyalaya, Kalamb, Dist. Osmanabad (MS) India

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor- 7.265, ISSN 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-26
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works


| | | |
|---|---|---|
| 36 | महात्मा फुले यांचे कृषि विकासविषयक चिंतन<br>डॉ.जयदेवी पवार | 117-119 |
| 37 | प्रेरणाप्रद चरित्र : राष्ट्रपुरुष छत्रपति शाहू महाराज<br>प्रा. डॉ. बंग नरसिंगदास ओमप्रकाश | 120-121 |
| 38 | थोर समाज सुधारक राजर्षी छत्रपती शाहू महाराज<br>डॉ.सुधीर व गायकवाड | 122-125 |
| 39 | हिंदी उपन्यास और दलित जीवन<br>डॉ. सय्यद अमर फकीर | 126-128 |
| 40 | महिलांचे प्रश्न आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर<br>प्रा.डॉ घोलप के जी | 129-131 |
| 41 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार<br>डॉ. घन आनंद लक्ष्मीकांत | 132-136 |
| 42 | थोर समाजशास्त्रज्ञ, सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष:राजर्षी शाहु महाराज<br>डॉ. हिराचंद्र रोहिदास मोरे | 137-141 |
| 43 | सामाजिक क्रांतीचे प्रणेते : महात्मा जोतीबा फुले<br>प्रा. डॉ. अभिमन्यू गेना ओहळ | 142-145 |
| 44 | महात्मा फुले यांचे शेती व शेतकऱ्याविषयाचे सद्यस्थितीशी पूरक असे विचार<br>प्रा.डॉ.मधूकर बाबूराव अनंतकवळस | 146-151 |
| 45 | छ. शाहू महाराजांचे आरक्षण धोरण आणि सद्यस्थिती<br>डॉ.दत्ता कुंचेलवाड | 152-154 |
| 46 | प्रजातंत्र भारत में विद्रोह का आगाज :आंबेडकरवाद<br>डॉ.सुरेश शेळके | 155-157 |
| 47 | राजर्षी शाहु महाराजाच्या कृषि विषयक विचाराचे विश्लेषण<br>प्रा. डॉ. ज्ञानेश्वर आनंदराव पुपलवाड | 158-159 |
| 48 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राजकिय विचार<br>डॉ.प्रा.लोखंडे बी.बी. | 160-162 |
| 49 | महात्मा ज्योतिबा फुले मराठी साहित्यातील क्रांतीयोद्धा<br>प्रा. डॉ. विशाल प्रकाश लिंगायत | 163-166 |
| 50 | राजर्षी शाहू महाराज : सामाजिक समता व न्यायाचे पुरस्कर्ते<br>प्रा. डॉ. नवनाथ राजाराम दणाणे | 167-171 |
| 51 | राजर्षी शाहू महाराज : एक समाजसुधारक<br>प्रा. नीलेश सर्जेराव साळवे | 172-174 |
| 52 | राजर्षी शाहु महाराजांचे आर्थिक व सामाजिक योगदान<br>प्रा. डॉ साबळे बालाजी आनंदा | 175-176 |
| 53 | राजर्षी शाहू महाराज यांनी केलेल्या प्रशासकीय सुधारणा<br>श्री नवथर सोपान लक्ष्मण | 177-179 |
| 54 | डॉ.,बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्य<br>आवारे प्रतिक चंद्रसेन | 180-182 |

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal
Impact Factor-7.265, ISSN : 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-26
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar : Thoughts and works

# महात्मा ज्योतिबा फुले मराठी साहित्यातील क्रांतीयोद्धा

प्रा. डॉ. विशाल प्रकाश लिंगायत
सहायक प्राध्यापक मराठी विभाग श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी, ता.- बार्शी, जि. सोलापूर
vishallingayat28@gmall.com

**प्रस्तावना :-**

महात्मा ज्योतिबा फुले यांचा जन्म पुणे येथे 11 एप्रिल 1827 रोजी झाला. ज्योतीबांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई. महात्मा ज्योतिबा फुले यांचे पूर्ण नाव ज्योतीराव गोविंदराव फुले हे मराठी लेखक, विचारवंत आणि समाजसुधारक होते. त्यांनी शेतकरी आणि बहुजन समाजाच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी केली आणि महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. इ. स. 1888 मध्ये त्यांना मुंबईतील एका सभेत जनतेने महात्मा ही पदवी बहाल केली. महात्मा फुले यांच्यावर 'थॉमस पेन' यांच्या 'राईट ऑफ मॅन' या पुस्तकाचा प्रभाव होता. ज्योतिराव केवळ नऊ महिन्यांचे होते, तेव्हा त्यांच्या आईचे निधन झाले. त्यांचा विवाह वयाच्या बाराव्या वर्षी सावित्रीबाई यांच्याशी झाला. प्राथमिक शिक्षणानंतर काही काळ त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला आणि इ. स. 1842 मध्ये माध्यमिक शिक्षणासाठी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धी त्यामुळे पाच-सहा वर्षातच त्यांनी आपला अभ्यासक्रम पूर्ण केला. ऑगस्ट 1848 मध्ये महात्मा फुले यांनी पुणे येथील बुधवार पेठेत भिडे यांच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. 17 सप्टेंबर 1851 रोजी रास्ता पेठेत मुलींचीच दुसरी शाळा त्यांनी सुरू केली. 15 मार्च 1852 रोजी वेताळ पेठेतील भिडे यांच्याच वाड्यात मुलींची तिसरी शाळा त्यांनी सुरू केली. इ. स. 1852 मध्ये दलितांना शिक्षण देण्यासाठी दलितांची पहिली शाळा त्यांनी सुरू केली. सन 1855 मध्ये रात्रीची शाळा, इ. स. 1863 मध्ये "बालहत्या प्रतिबंधक गृहाची" स्थापना त्यांनी आपल्या घरीच केली. सन 1864 मध्ये पुण्यात एक विधवा पुनर्विवाह त्यांनी घडवून आणला. इ. स. 1868 मध्ये स्वतःच्या घरातील पिण्याच्या पाण्याचा हौद त्यांनी अस्पृश्यांना खुला करून परंपरागत रूढींना धक्का दिला. 'शेतकऱ्यांचा आसूड' या आपल्या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्यांचे विदारक चित्र रेखाटून शिक्षणा अभावी समाजाची स्थिती किती हलाखीची होते हे दाखवून दिले. यातच त्यांनी शिक्षण, वसतीगृह, सिंचन, धरणे, तलाव, विहिरी यासारखे उपाय सुचवले. सुधारणावादी विचारांचा प्रसार करण्यासाठी कृष्णराव भालेकर यांच्या मदतीने त्यांनी पुण्यातूनच 'दीनबंधू' हे वृत्तपत्र इ. स. 1877 मध्ये सुरू केले. 24 सप्टेंबर 1873 रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

**महात्मा ज्योतिबा फुले यांचे सामाजिक कार्य :-**

महात्मा फुले यांनी हंटर कमिशनपुढे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे अशी आग्रहाची मागणी केली. "महात्मा फुले यांनी 'तृतीय रत्न' या नाटकातून अज्ञानी लोकांत ब्राह्मण अंधश्रद्धा रूजवून त्यांना कसे नाडतात यांचे चित्रण ठिकठिकाणी केले आहे." १. महाराष्ट्रातील शूद्रातिशूद्रांच्या उन्नतीकरिता ते रात्रंदिवस झटत होते, त्यासाठी त्यांनी वेगवेगळे उपक्रम हाती घेतले. ते पार पाडतांना जे बरे-वाईट अनुभव आले त्यातून त्यांना एक नवी दृष्टी मिळाली. हिंदू धर्मातील अनेक दैवतांची उपासना, जातिभेद, अस्पृश्यता आणि विधिनिषेध यांचे अवडंबर या गोष्टी त्यांना मनापासुन त्याज्य वाटत होत्या, त्यामुळे ख्रिस्तप्रणित ईश्वरनिष्ठ मानवतावादाचा आणि ख्रिस्ती धर्मोपदेशक यांच्या समर्पित जीवनाचा व कार्यपद्धतीचा त्यांच्या मनावर खूप मोठा प्रभाव पडला. "लोकांच्या भावभावनांना कसलाही तडा न जाऊ देता इंग्रजांनी नाना प्रकारच्या सुविधा, सुधारणा केल्या." 2.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal
Impact Factor-7.265, ISSN [illegible], December 2021, Volume-12, Issue-26
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar - Thoughts and works

दिवस-रात्र होते. एक पृथ्वी सर्व माणसांना सुखी करते, तर मग मानवाने धर्म अनेक कशाला. पृथ्वी ही एकच आहे मग मानवाचा धर्म एकच असावा असा असामान्य विचार महात्मा फुले व्यक्त करतात.

संदर्भ टीपा :-

1) डॉ. रामटेके हंसराज, "महात्मा फुले यांच्या वाङ्मयातील सामाजिक विचार", चिन्मय प्रकाशन - औरंगाबाद, प्र.आ., ऑगस्ट - 2012, पृष्ठ - 33
2) डॉ. शिंदे संजय, "साहित्य विचार आणि परिवर्तन प्रत्यय", प्रबोधन प्रकाशन - सिडको, औरंगाबाद, प्र.आ., एप्रिल- 2015, पृष्ठ - 85
3) तत्रैव, पृष्ठ.- 72
4) डॉ. वाळके अनिता, "बहुजनांची विचारधारा", लेख - प्रा. चव्हाण बादलशाहा डोमाजी, "महात्मा फुले यांची अखंड रचना", कॉन्फिडन्स फाउंडेशन नागपुर आणि अहमदाबाद, प्रथमावृत्ती, 2015, पृष्ठ- 61.
5) प्रा. नरके हरी, (संपा.) "महात्मा फुले साहित्य आणि चळवळ", लेख - सूर्यवंशी कृ. गो. "सत्यशोधक समाज महात्मा ज्योतिराव फुले", चरित्र साधने प्रकाशन समिती - मुंबई, आठवी आवृत्ती, 2018, पृष्ठ - 207.
6 डॉ. रामटेके हंसराज, उ. नि.1, पृष्ठ - 56

200

ISSN 2231-2137

CONTEMPORARY RESEARCH IN INDIA

A Peer-Reviewed Multi-Disciplinary International Journal

Impact Factor 2016 : 0.956 (GIF)

# स्त्री आणि साहित्य : नोंदी आणि निरीक्षणे

8 मार्च 2022

प्रचंड वादाच्या
भोवऱ्यात
अडकत राहिली
ती ..........
गटांगळ्या
खाणाऱ्या
मनोवस्थेतून
किलकिलत्या डोळ्यांनी,
सावध होऊन
भेदक नजरेने
आजूबाजूचा
वेध घेत
सावकाशपणे
धरतीवर
स्थिर होऊ पाहणारी,
ती ..........
असंख्य संकटातून संघर्षाने
तग धरून
दीर्घ श्वासानंतर
अचानक झेपावते
व क्षणात
आकाशाला कवेत घेते.

प्रा. डॉ. भारती रेवडकर

विशेषांक संपादक

202



CONTENTS



| Sr. No. | Title of the Article | Page No. |
|---|---|---|
| 1 | बिजापूर डायरी आणि आदिवासी स्त्री : एक चिकित्सा<br>प्रा. डॉ. भारती रेवडकर | 01 |
| 2 | रेव्हरंड ना.वा. टिळकांची स्त्रीविषयक भूमिका<br>प्रा. डॉ. पौर्णिमा कोल्हे | 05 |
| 3 | शुद्ध, सात्त्विक प्रेमाचे मूर्तरूप : सावित्री<br>डॉ. पांडुरंग भोसले, डॉ. सचिन रूपनर | 10 |
| 4 | गोंडवानातील महान वीरांगनांच्या कार्यकर्तृत्वाचा दस्तावेज<br>प्रा. डॉ. माहेश्वरी वीरसिंग गावित | 15 |
| 5 | स्त्रियांच्या अंतर्मनाचा वेध घेणारी कादंबरी – 'रीटा वेलिणकर'<br>डॉ. वर्षा वि. देसाई–रुपनर | 21 |
| 6 | दास्यशृंखला व जातवास्तवाचे क्रांतिपर्व : मुक्ता साळवे<br>प्रा. डॉ. बाळासाहेब दास | 26 |
| 7 | स्त्रीवादी संकल्पना आणि स्वरुप : एक मागोवा<br>प्रा. डॉ. विशाल प्र. लिंगायत | 30 |
| 8 | दलित कवितेतील स्त्री रुप आणि स्वरुप<br>प्रा. डॉ. बिरा पारसे | 33 |
| 9 | नव्वदोत्तर मराठी कथेतील स्त्रीवाद<br>प्रा. डॉ. रविकांत शिंदे | 40 |
| 10 | २००० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील स्त्री चित्रण<br>प्रा. डॉ. शारदा वामन मोरे | 46 |
| 11 | प्राचीन काळ व स्त्रियांचे अधिकार<br>प्रा. विजया द. जगताप | 51 |
| 12 | कोविड – १९ चा बार्शी शहरातील घरकाम करणाऱ्या महिला कामगारांवर झालेल्या परिणामाचा चिकित्सक अभ्यास<br>डॉ. प्रा. शोभा विष्णुपंत खंदारे | 53 |
| 13 | स्त्रीवाद : संकल्पना आणि सिध्दांकन<br>प्रा. शुभदा उपासे–शिवपूजे | 59 |
| 14 | 'अश्रूंची फुले' काव्यसंग्रहातील स्त्री जीवन'<br>संतोष लोंढे | 63 |
| 15 | स्त्रीवादी दृष्टिकोनातून स्त्री चित्रण : मेघना पेठे यांच्या कथा<br>शोभा हणमंतराव मिसाळ | 70 |
| 16 | प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेतील स्त्रीवाद<br>कु महानंदा शिवशरण बनसोडे | 73 |
| 17 | जयंत नारळीकर लिखित "चार नगरातले माझे विश्व" आत्मचरित्रातील स्त्री चित्रण<br>मंदा सुभाष हाडवळे | 76 |

Contemporary Research In India (ISSN 2231-2137): Impact Factor : 4.58 (CIF)

CONTEMPORARY RESEARCH IN INDIA
ISSN 2231 - 2137

# स्त्रीवादी संकल्पना आणि स्वरुप : एक मागोवा

प्रा. डॉ. विशाल प्र. लिंगायत
सहाय्यक प्राध्यापक (मराठी विभाग)
श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी
मो. नं. ७५८८०२०२९० / Email. ID : vishallingayat28@gmail.com

स्त्रीवादी संकल्पना :

'स्त्रीवाद' ही संकल्पना मुख्यत: स्त्रियांच्या हक्काशी, स्त्रियांच्या विचाराशी, स्त्रियांच्या भावनेशी निगडीत आहे. 'स्त्रीवाद' हा असा विचारप्रवाह आहे, जो स्त्रियांच्या दुय्यम स्थानाचे, तिच्यावर होणाऱ्या शोषणाचे, गुलामगिरीचे, लादलेल्या बंधनांचे, तिच्यावर होणाऱ्या अन्यायाचे व पुरुषाने तिच्यावर लादलेल्या दुय्यमत्वाचे स्थान यासंबंधीचे नवे आकलन करुन देणारा हा स्त्रीवादी विचारप्रवाह आहे. "स्त्रियांमधले माणूसपण जागृत करणारी 'स्त्रीवाद' ही एक परिवर्तनवादी आणि राजकीय विचारप्रणाली आहे."[१]

'स्त्रीवाद' समजून घेण्यासाठी स्त्रियांना समाजामध्ये मिळणाऱ्या दुय्यम स्थानाविषयीचे विचार समजून घेणे आवश्यक ठरते. स्त्रीकडे एक व्यक्ती म्हणून पाहण्यापेक्षा 'बाई' म्हणून पाहिले जाते. जन्माला आलेल्या प्रत्येक स्त्रीला आपल्या जीवनात मुलगी, पत्नी, आई, बहिण, सून, सासू अशा वेगवेगळ्या भूमिका पार पाडाव्या लागतात. स्त्रीला लहाणपणी आपल्या कुटुंबात वडीलांच्या छायेत आपले आयुष्य घालवावे लागते. पुरुषसत्ताक समाजाने स्त्रीला कुठल्याही प्रकारचे निर्णय स्वातंत्र्य दिलेले नाही. स्त्रीने आपल्या कुटुंबासाठी स्वत:चे अस्तित्व विसरुन दुसऱ्याची सेवा-सुश्रुषा करणे, त्याग करणे यातच तिला आपले आयुष्य घालवावे लागते. मुख्यतः स्त्रियांच्या हक्काशी स्त्रीवाद निगडीत आहे. "स्त्रीला व्यक्तीसारखं जगू द्या, तिच्याकडे सन्मानाने बघा, तिलाही एक मन आहे, तिच्याही काही भावना आहेत, ती आदरास पात्र आहे, तिही हाडामासांची एक व्यक्ती आहे. तिचेही काही अधिकार आहेत. ते आपण मान्य करायला हवेत बस हाच स्त्रीवाद आहे."[२]

स्त्रीवाद विचार प्रवाहाला १८ व्या शतकापासून सुरुवात झालेली दिसते. सुरुवातीच्या काळात स्त्रीवादी प्रवाहाच्या वेगवेगळ्या चळवळी, स्त्रीमुक्ती विचार, आंदोलने पुरुषी वर्चस्वाखाली दडपले गेले हो१९६० च्या नंतर मात्र स्त्रीवादाच्या संदर्भात वेगवेगळ्या चळवळी, विचार प्रवाह निर्माण झालेले दिसतात. या पाश्चात्य स्त्रीवादी अभ्यासकांच्या विचारधारा बघितल्यास स्त्रीवादी विचार प्रवाहाचे बदलते स्वरुप स्पष्ट होते. भारतातील स्त्रीवादी विचार प्रवाह १९६० नंतरच्या स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री प्रश्नांसंबंधी विचार, चळवळी, आंदोलने या गोष्टींची तिव्रता वाढलेली दिसते. त्यामुळे त्यातूनच स्त्रीवाद, स्त्रीमुक्तीवाद या विचारांचा प्रभाव जगभरातील वेगवेगळ्या देशांमध्ये पडलेला आढळतो. भारतातील स्त्रीवादी विचार प्रवाहाचा इतिहास बघितल्यास असे दिसुन येते की, "शिकारीच्या आणि कंदमुळे गोळा करण्याच्या अवस्थेत लैंगिकतेवर आधारित श्रमविभागणी तितकी काटेकोर नव्हती. फळे-कंदमुळे गोळा करणाऱ्या स्त्रिया शिकारीमध्येही सहभागी होत असत"[४] प्राचीन काळात, वेदकाळातही स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान दर्जा मिळत होता याचे पुरावे सापडतात. धर्मकार्य, रुढी, परंपरा, संस्कृती, यज्ञयाग, घरामध्ये समान मालकी अशा वेगवेगळ्या सामाजिक गोष्टींमध्ये देखील स्त्रीला आदराचे व पतीबरोबर समान दर्जा समान हक्काचे स्थान मिळत होते. धार्मिक व सांस्कृतिक कार्यामध्ये पती-पत्नीला उच अधिकार व दर्जा मिळत असे. आपल्या पतीच्या गैरहजेरीत पत्नीला धार्मिक विधी, संस्कार पार पाडण्यास परवानगी होती. याचे बरेचसे पुरावे प्रागैतिहासिक काळात बघावयास मिळतात. वैदिक काळामध्ये विद्या संपादन करुन सुशिक्षित, शिक्षीत झालेल्या गार्गी, कात्यायनी, मैत्रेयी, सुलभा यांची नावे आजही आदराने घेतली जातात. त्याकाळातही विधवापुनर्विवाहाला मान्यता, बालविवाहाला विरोध, पती निवडीचे स्वातंत्र्य पतीच्या बरोबरीचे अधिकार, सार्वजनिक जीवनामध्ये

Contemporary Research In India (ISSN 2231-2137): Impact Factor : 4.58 (CIF)

[illegible] काळ पुढे पुढे धावत होता त्याबरोबर स्त्रीसुध्दा धावत होती, विज्ञान आणि [illegible]
आपल्या [illegible] उभ्या राहिल्या [illegible] सुधारणावादी [illegible] स्त्री शिक्षणाचा आग्रह धरल्यामुळे स्त्री शिक्षणाची [illegible]
[illegible] एकोणिसाव्या शतकामध्ये [illegible] "भारतीय स्त्री जीवन" या ग्रंथामध्ये म्हणतात की, "स्त्रियांची [illegible]
दिसून येते. त्यामुळेच की काय गीता साने आपल्या [illegible] तरुणांच्या हातात स्त्रियांच्या प्रश्नाची सूत्रे होती"
पाहून [illegible] वरिष्ठ जातीतील उदारमतवादी [illegible] या स्त्रीवादी [illegible]

'स्त्रीवाद' ही एक समाज परिवर्तन घडवू पाहणारी राजकीय व सामाजिक जाणीव आहे. [illegible] साहित्यात आढळून येतो. मार्क्सवादी स्त्रीवाद, [illegible] विविध दृष्टिकोणातून भिन्न पताळ्यांवरचा अविश्वास स्त्रीवादी साहित्यात आढळून येतो. मार्क्सवादी स्त्रीवाद, [illegible] स्त्रीवाद, पर्यावरणवादी स्त्रीवाद, समतावादी स्त्रीवाद, ब्रिटीश स्त्रीवाद, भारतीय स्त्रीवाद, फुले-आंबेडकरवादी [illegible] अस्तित्ववादी स्त्रीवाद अशा अनेक विचार प्रणालींमध्ये स्वत:ची भर घालून स्त्रीवादी भान - विचार स्त्री-पुरुष [illegible] मीमांसा करते. म्हणून काळाच्या प्रत्येक टप्प्यावर स्त्रीवादाची भिन्न रुपे दिसतातच. परंतु त्याचेच प्रतिबिंब वेगवेगळ्या [illegible] वेगवेगळ्या कालखंडात लिहील्या गेलेल्या स्त्रीवादी साहित्यातून दिसून येते आणि पुढच्या काळातही ते असेच दिसून येत [illegible] शंका नाही. शेवटी स्त्री म्हणून घडतांना आलेल्या अनुभूती अभिव्यक्त करणारे साहित्य म्हणजेच स्त्रीवादी साहित्य होय [illegible] वाटते.

संदर्भ टीपा:


१ महाराज वंदना, 'स्त्रीवाद आणि समाजपरिवर्तन', अथर्व पब्लीकेशन, धुळे, प्रथमावृत्ती २०१३, पृ. ५३

२. सबाणे अरुणा, 'स्त्रीवाद : एक दृष्टिक्षेप' आकांक्षा प्रकाशन, नागपूर, प्र.आ, २००९, पृ. ६

३. धोंगडे आश्विनी, 'स्त्रीवादी समीक्षा स्वरुप आणि उपयोजन', दिलीपराज प्रकाशन, पुणे प्र. आ. १९९३, पृ. ६

४ पाटील शोभा, 'स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००७, पृ. ३९

५. म्हेत्रे स्मिता, "भारतीय स्त्री आणि मानवाधिकार," श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर, प्र. आ. २०११, पृ.७०


६. चव्हाण प्रविण, (स्वैर अनुवाद) "प्रारंभीचे स्त्रीवाद : संदर्भ साहित्याचा वेध," क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री.अ. केंद्र. पुणे विद्या. पुणे, २०११, पृ. १२४

७ लपाध्ये दादुराव, "ग्रामीण साहित्यातील स्त्री चित्रण," स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, प्र. आ. २००९, पृ. १४२

८. पाटील शोभा, उ.नि. ४ पृ. ४९

206

March- 2022 E-ISSN : 2348-7143



INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue -290

**Guest Editor**
Dr. Suresh S. Bakare
Principal, Shri Dnyanesh Mahavidyalaya,
Nawargaon, Dist. Chandrapur
Maharashtra, India.

**Executive Editors**
Dr. Gajanan Kortalwar (Head, Dept. of Marathi)
Mr. Durgesh Kshirsagar (Assist. Prof. English)
Dr. Asteek Mungmode (Head, Dept. of Economics)
Shri Dnyanesh Mahavidyalaya,
Nawargaon, Dist. Chandrapur
Maharashtra, India.

**Chief Editor : Dr. Dhanraj Dhangar**

RESEARCH JOURNEY

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

207



March-2022 E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue - 290

**Guest Editor**
**Dr. Suresh S. Bakare**
**Principal, Shri Dnyanesh Mahavidyalaya,**
**Nawargaon, Dist. Chandrapur**
**Maharashtra, India.**

**Executive Editors**
**Dr. Gajanan Kortalwar (Head, Dept. of Marathi)**
**Mr. Durgesh Kshirsagar (Assist. Prof. English)**
**Dr. Asteek Mungmode (Head, Dept. of Economics)**
**Shri Dnyanesh Mahavidyalaya,**
**Nawargaon, Dist. Chandrapur**
**Maharashtra, India.**

**Chief Editor : Dr. Dhanraj Dhangar**

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : 1

*Cover Photo (Source) : Sinhgad College of Commerce, Chandivali, Mumbai-400072, India.

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 1000/-

Published by –

© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 290 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
March-2022

## INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 01 | Research in Language and Literature: Scope, New Trends and Application | Dr. Shriram G. Gahane | 05 |
| 02 | Life Care and Socio-Philosophical Elements in Sadhana Amte's Samidha: A Critical Study | Mrs. M.D.Chitalkar | 09 |
| 03 | Research in Gender: Indian Perspectives | Mr Durgesh R Kshirsagar | 12 |
| 04 | A Cross Cultural Encounter of Interpreter Of Maladies | Dr Shailendra Kumar Chourasia | 14 |
| 05 | Reconstruction of Past in Amitav Ghosh's The Calcutta Chromosome | Dr Shailendra Kumar Chourasia | 20 |
| 06 | Handling of English Language on Social Media | Dr. Nisha Bhagwat Gosavi | 26 |
| 07 | An Eco-Critical Study of Amitav Ghosh's Gun Island | Mr. Dnyaneshwar Karbhari Nikam, Dr. Rajendra Dattatraya Gholap | 28 |
| 08 | Importance of Parts of Speech Acquiring English Language | Dr. Nitesh Nilkanthrao Telhande | 32 |
| 09 | Teaching Poetry with Music Method | Raju Raosaheb Salve, Dr. Mahendra Sahebrao Shinde. | 38 |
| 10 | The Phenomenon of Honour Killing and Honour-Based Violence: A Study of Bapsi Sidhwa's The Pakistani Bride | Mr. Kishor B. Ahire, Dr. Rajendra Dattatraya Gholap | 42 |
| 11 | साहित्य में अनुसंधान : समस्या और समाधान | डॉ. लक्ष्मीकान्त चंदेला | 47 |
| 12 | अर्थशास्त्रातील संशोधनाच्या नव्या दिशा - एक अध्ययन | डॉ. विजय आनंदराव दरवडे | 53 |
| 13 | सामाजिक संशोधनातील टप्पे किंवा पायऱ्या | डॉ. सोमा पी. गोंडाणे | 58 |
| 14 | सामाजिक शास्त्रातील संशोधन आणि त्याचे उपयोजन – एक चिकित्सक अध्ययन | डॉ.विनायक बाजीराव शिंदे | 65 |
| 15 | मानव विज्ञानशास्त्रअंतर्गत संशोधनांची आवश्यकता | प्रा. डॉ. स्वामी विरभद्र गुरप्पा | 70 |
| 16 | बालकामगार समस्येवरील समाजशास्त्रीय सैद्धांतीक परिप्रेक्ष | प्रा.गजेंद्र कढव | 76 |
| 17 | भारतीय इतिहासलेखनावर मार्क्सवादाचा प्रभाव | प्रा. रमेश नरसिंग पोराव | 81 |
| 18 | उच्च शिक्षण व संशोधन संस्थांमधील विद्यार्थ्यांना संशोधनाद्वारे राज्याच्या सामाजिक व आर्थिक विकासात सहभागी करून घेणे. विशेष संदर्भ: महाराष्ट्र उन्नत अभियान | डिके विनोद रमेश | 84 |
| 19 | पारधी समाजातील महिलांचे अध्ययन: सामाजिक संशोधनाचा नवीन प्रवाह | दिपाली शंकर वाघमारे | 92 |
| 20 | संत साहित्यातील संशोधनाच्या नव्या दिशा | डॉ.चंद्रशेखर भगत | 99 |
| 21 | भाषा व साहित्यातील संशोधनाच्या प्रेरणा | डॉ. विशाल प्रकाश लिंगायत | 103 |
| 22 | जागतिकीकरण : मराठी साहित्यातील संशोधनाची दिशा | डॉ.गजानन कोर्तलवार | 108 |
| 23 | भाषा व साहित्य संशोधनाच्या प्रेरणा | डॉ. मीनाक्षी देव (निमकर) | 115 |
| 24 | मराठी आत्मचरित्रांच्या संशोधनातील नवे प्रवाह | डॉ जगदीश शेवते | 119 |
| 25 | मराठी भाषा संशोधनाच्या नव्या दिशा | प्रा.बाळू भंडारे | 123 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 290 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
March-2022

209

# भाषा व साहित्यातील संशोधनाच्या प्रेरणा

प्रा. डॉ. विशाल प्रकाश लिंगायत
सहायक प्राध्यापक ( मराठी विभाग )
श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय,
बार्शी, ता.- बार्शी, जि. सोलापूर
मोबा. नं – 7588020290
Mail.I.D -vishallingayat28@gmail.com

**प्रस्तावना –**

भाषा व साहित्यातील संशोधनाच्या मुख्य प्रेरणा कोणत्या.? याचा विचार करत असताना मराठी साहित्यातील संशोधन कार्याचा व भाषेच्या अंगाने संशोधन केलेल्या साहित्याचा संदर्भ बघणे महत्त्वाचे ठरते. तसे बघितल्यास मराठी भाषा व साहित्य संशोधनाच्या कार्याचा खरा प्रारंभ एकोणिसाव्या शतकात झालेला बघावयास मिळतो. परंतु प्राचीन काळापासूनच मराठी साहित्यातील संशोधनाच्या पाऊलखुणा या रुजलेल्या दिसतात. प्राचीन व मध्ययुगीन वाङ्मयाचा, इतिहासाचा धांडोळा घेतल्यास मध्ययुगीन मराठी साहित्यात विशेषतः संत साहित्यात काही महत्त्वाचे संप्रदाय निर्माण झालेले बघावयास मिळतात. त्यात नाथ संप्रदाय, शैव संप्रदाय, महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय, वीरशैव संप्रदाय, नागेश संप्रदाय, दत्त संप्रदाय, समर्थ संप्रदाय या वेगवेगळ्या संप्रदायातूनही साहित्यातील संशोधनाच्या अंगाने बरेचसे संदर्भ आलेले बघावयास मिळतात. महानुभाव संप्रदायातील म्हाईंभट्ट यांनी महानुभाव संप्रदायाचे संस्थापक श्री. चक्रधरस्वामी यांच्या आठवणी म्हणजेच लीळा संकलित करून केलेले संशोधनकार्य निश्चितच वैशिष्ट्यपूर्ण ठरते. महानुभावीयांचे तत्त्वज्ञान व आचारधर्माचे महत्त्व सांगणाऱ्या केशिराजबास यांनी केलेले संकलनही प्राचीन साहित्यातील संशोधनाचे एक महत्त्वाचे उदाहरण ठरते. "नाथ संप्रदायाची परंपरा सांगणारे विपुल साहित्य प्राचीन व मध्ययुगीन काळात मराठी वाङ्मयात आढळते. नाशिक, त्र्यंबकेश्वराच्या परिसरात गोरख, गहिनी इत्यादी सिद्धांच्या निवासाने पुनीत झालेली स्थळे आजही दाखविण्यात येतात." १

सोळाव्या शतकातील संत एकनाथ महाराजांनी 'ज्ञानेश्वरी' उर्फ 'भावार्थदीपिका' या ग्रंथाची केलेली पाठशुद्ध प्रतसुद्धा यासंदर्भात महत्त्वपूर्ण ठरते. बखर, शिलालेख, ताम्रपट, जुनी हस्तलिखिते मिळवून प्राचीन मराठी वाङ्मयातील संशोधन करण्याचे जे प्रयत्न एकोणिसाव्या शतकात झाले, त्यात परशुरामपंततात्या गोडबोले यांनी काढलेले 'नवनीत' इ. स. (१८५४) हे विशेष उल्लेखनीय म्हणून सांगता येते. डॉ. विल्सनसारख्या धर्मोपदेशकांनी संशोधन क्षेत्रात टाकलेली महत्त्वाची भर यासंदर्भात विशेष महत्त्वाची ठरते. अज्ञानामुळे किंवा पूर्वग्रहदूषित दृष्टीमुळे त्यांच्या संशोधनात काही अपसिद्धांत येऊ लागले, ते खोडून काढण्यासाठी आपल्याकडे इतिहास, भाषा, साहित्य, वाङ्मय इत्यादींच्या संशोधनाला विशेष चालना मिळाली. प्राचीन संत व पंडित कवींच्या निवडक विचारांचा हा संग्रह त्या कवींची ओळख करून देण्याच्या

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 290 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
March-2022

बोलीभाषा व लोकसंस्कृतीतील लोकगीते, लोककथा, दैवतकथा, नीतिकथा जमवून त्यांनी त्या ग्रंथरूपात प्रकाशित केल्या आहेत. "नीतिकथेप्रमाणेच दैवतकथाही नीतिकथेच्या उत्पत्तींचा वेध घेतांना मार्गदर्शक ठरतात. दैवतकथांचा जन्मही आदिमकाळात झालेला आहे."[९] दुर्गाबाई भागवत यांचाही उल्लेख यासंदर्भात महत्त्वाचा ठरतो. त्यांनी 'लोकसाहित्याची रूपरेखा' (१९५६) हा ग्रंथ लिहून मराठी साहित्य व लोकसाहित्याच्या संशोधनात एक महत्त्वाचा टप्पा प्रस्थापित केला आहे. हा ग्रंथ लोकसाहित्याच्या अनेक पैलूंवर प्रकाश टाकणारा म्हणून ओळखला जातो. मराठी रंगभूमी व नाट्यसृष्टी हे ही संशोधनाचा विषय असले तरी, या विषयासंबंधी पाहिजे तितके शास्त्रशुद्ध संशोधन झालेले आढळून येत नाही. 'मराठी रंगभूमी' (१९०३) हा आ. वि. कुलकर्णी यांचा ग्रंथ मराठी रंगभूमीच्या सुरुवातीच्या टप्प्यातील गोष्टींचे विवेचन करताना दिसतो ; पण तो संशोधनाच्या अंगाने तितकासा योग्य वाटत नाही. "रंगपीठावरून सादर होणारा दृक्श्राव्यात्मक साहित्यातला आणखी एक प्रकार म्हणजे भारूड. भारूडांची रचना मूळातच सोंग - संपादणीच्या निमित्ताने झालेली आहे."[१०] मराठी 'नाट्यकला आणि नाट्यवाङ्मय' (१९५९) हा ग्रंथ श्री. ना. बनहट्टी यांनी लिहिला. त्यात मात्र मराठी रंगभूमीविषयक चांगल्या दर्जाचे संशोधन झाल्याचे पडावयास मिळते. त्यामुळे या सर्व संदर्भांचा व घेतलेल्या ग्रंथांचा निश्चितच साहित्य संशोधनात महत्त्वपूर्ण वाटा आहे. भाषा व साहित्याच्या संशोधनात काम करण्यासाठी ह्या सर्व संशोधित ग्रंथांचा ठेवा पुढील नवलेखकांना, अभ्यासकांना व समीक्षकांना नक्कीच मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरेल असे वाटते.

**संदर्भटीपा :-**

१) कुलकर्णी श्रीधर रंगनाथ, 'मध्ययुगीन मराठी साहित्य: एक पुनर्विचार', राजहंस प्रकाशन - पुणे, प्र.आ. ३ ऑक्टो. १९९५, पृ. ८२.

२) तत्रैव, पृ. ७.

३) डॉ. पठाडे सदा, 'साहित्य विश्लेषण', स्वरूप प्रकाशन-औरंगाबाद, प्र.आ. जाने. १९९९, पृ. १०६.

४) तत्रैव, पृ. ६८.

५) देशपांडे कुसुमावती, 'मराठी कादंबरी पहिले शतक', १८५० ते १९५०, मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशक - गिरगाव, मुंबई, द्वि.आ. १९७५, पृ. १२.

६) आष्टीकर, मधुकर, (संपादक), लेख- अडवंत म. ना. 'डॉ. कोलते गौरवग्रंथ'- अमरावती, १९६९.

७) डॉ. कुलकर्णी कृ. पा., 'मराठी भाषा उद्गम व विकास', मेहता पब्लिशिंग हाऊस - पुणे, पा. आ.जाने. २००९, पुनर्मुद्रण- नोव्हें. २०१७, पृ. ८४.

८) डॉ. व्यवहारे क्रांती, 'संस्कृत लोककथा', ऊरवेला प्रकाशन- विवेकानंद नगर- हिंगोली, मार्च - २०१३, पृ. ५६.

९) तत्रैव, पृ. ५७.

१०) कुलकर्णी श्रीधर रंगनाथ, उ.नि.१, पृ. १५०.